संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# (नि)कालाय तस्मै नमः ...!

**सतराव्या** लोकसभेच्या निवडणुकीची पूर्णाहूती झाली आहे असे म्हटले तरी चालेल. मतदानोत्तर चाचणीपासून ते निवडणुकीच्या निकालापर्यंत अनेक प्रकारचे अंदाज आणि भाकिते वर्तवली गेली होती. त्या सगळ्यांना आता पूर्णविराम मिळाला आहे. केंद्रामध्ये पुन्हा भारतीय जनता पार्टीचे सरकार स्थानापन्न होईल. निवडणूक म्हटल्यानंतर यश , अपयश, जय पराजय या गोष्टी त्या त्या राजकीय गोष्टींसाठी स्वाभाविक स्वरुपाच्या ठरतात. परंतु जो सामान्य माणूस जी उद्दीष्टे मनामध्ये ठेवून मतदान करतो त्याच्या भावनांचादेखील याचवेळी विचार झाला पाहिजे. निकालाच्या दिवशी राजकीय पक्ष, राजकीय नेते तथाकथित राजकीय विश्लेषक यांची अखंड बडबड किंवा विश्लेषण सुरू असते. परंतु त्यामध्ये कुठेही सामान्य माणसांच्या भावना व्यक्त होताना दिसत नाहीत. कोणाला किती जागा मिळाल्या कोण कशामुळे निवडून आला कोणाचे डावपेच कसे यशस्वी झाले. किंवा फसले याचीच चर्चा होत राहाते. परंतु भारताच्या संविधानाने लोकशाही व्यवस्था मजबूत राहावी म्हणून निवडणुकीसारखी प्रक्रिया उपलब्ध करून दिली. त्या माध्यमातून सामान्य माणसाच्या अपेक्षांची पूर्तता होऊ शकेल. सामाजिक एकता, सुरक्षितता वृध्दिंगत होईल. सामान्य माणसाच्या जीवनाचा स्तर उंचावेल आणि या सर्व गोष्टी घडून येण्याकरीता निवडून येणारी नवी व्यवस्था किती जबाबदारीने वागेल या बद्दलचे मतप्रदर्शन होणे तितकेच गरजेचे असते. निवडून येणारा पक्ष म्हणजे त्याच्या प्रचार आणि राजकीय डावपेचांचे ते यश मानले जाते. परंतु हे अर्धसत्य म्हणायला हवे. जनता ज्यावेळी मतदान करते. त्यावेळी तिने आपला सारासारविवेक गहाण ठेवलेला नसतो. म्हणूनच तिने केलेल्या मतदानाला कौल असा शब्द वापरला जातो. आपण निवडून द्यावयाचा उमेदवार तो ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करतो तो सर्वच पक्ष या सर्वांची गुणवत्ताही तो पाहात असतो. मनामध्ये काही अपेक्षा ठेवून तो मतदान करतो. त्या अपेक्षा जाणून घेणे किंवा त्याने व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवणे हे निवडून येणाऱ्या उमेदवारांचे आणि पक्षांचे पहिले कर्तव्य ठरते. अनेक वेळेला विजयाचा उन्माद एवढा असतो की त्या नशेमध्ये मतदारांच्या विश्वासाचे भान ठेवले जात नाही किंबहुना आपल्या व्यवहारातून त्या मतदानाचा अपमानही करून घेतो.

## ऊतू नका मातू नका

यावेळच्या निवडणूक निकालात भारतीय जनता पार्टीने आपले वर्चस्व जर कायम ठेवले असेल तरी विरोधी पक्षांनी जी एकजूट दाखवली त्यामुळे सुध्दा भारतीय जनता पार्टीला प्रचारासाठी प्रचंड परिश्रम करावे लागले. त्या परिश्रमाचे चीज झाले की नाही हे त्या पक्षाने ठरवायचे आहे. परंतु मतदारांच्या मतांचा सन्मान हे त्या संपूर्ण निकालाचे मर्म कसे राहील हे बघायला हवे. विरोधी पक्षांनी संपूर्ण ताकद लावून निवडणुका लढवल्या आणि सत्ताधारी पक्षांनी आपल्या सत्तेचा योग्य तो उपयोग करून निवडणुकीवर आपला प्रभाव कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. निवडणुकीचे निकाल म्हणजे मोदींची लोकप्रियता असा सरसकट निष्कर्ष न काढता लोकांना अपेक्षित असलेल्या राज्यकारभाराविषयी लोकांनी व्यक्त केलेल्या ज्या अपेक्षा आहेत. अशा प्रकारचे विश्लेषण मांडले गेले पाहिजे. शेवटी अनेक गोष्टी या काळानुसार घडत असतात. किंवा काळावर सोडून द्याव्या लागतात. त्यालाच 'कालाय तस्मै नमः' असे म्हटले जाते. निवडणुकीच्याबाबती सांगायचे झाले तर ज्या पध्दतीचे निकाल लागले आहेत ते पाहिल्यावर 'निकालाय तस्मै नमः' असे त्याचे वर्णन करावे लागेल. कारण तो मतदारांचा कौल तर आहेच. पण मतदारांनी पुन्हा एकदा आपल्या अपेक्षांच्या सन्मानाचे आव्हान मोदींपुढे उभे केले आहे. याला केवळ मोदीच नव्हे तर सत्ताधारी भाजपा कशा पध्दतीने पेलतो हे येणाऱ्या काळात दिसून येईल. विजयाचे जल्लोष साजरे करीत असताना ऊतू नका मातू नका लोकशाहीचा वसा टाकू नका. याचे पुन्हा पुन्हा स्मरण करून द्यावे लागेल. कारण सत्ता ही एक अशी गोष्ट आहे की जी अपेक्षेपेक्षा जास्त प्रमाणात मिळाली तर त्याचे मस्तीमध्ये रुपांतर होते. सामान्य माणसाच्या मतदानाची किंमत केली जाते. आणि याच सत्तेच्या आणि पैशाच्या जोरावर आपण पुन्हा पुन्हा निवडून येऊ शकतो. अशी दर्पोक्तीही व्यक्त होत राहाते.

## सत्ता आणि पैसा

अर्थात या लोकसभा निवडणुकीची वैशिष्टये लक्षात घेतली पाहिजेत. भारताच्या आतापर्यंतच्या राजकीय इतिहासामध्ये पहिल्यांदाच गैरकाँग्रेसी पक्षाला सलग दुसऱ्यांदा बहुमत मिळवता आले. ते मिळवत असताना ज्या पक्षाने प्रचारामध्ये ज्या पध्दतीने पैसा आणि आधुनिक साधनांचा उपयोग केला तोदेखील कोणाच्याही नजरेत भरणारा होता. प्रामुख्याने सोशल मीडियाचा आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाचा भरपूर वापर केला गेला. सर्व बाजूंनी या सगळ्या मुद्दांचा विचार केला तर निवडणुकीचा हा रणसंग्राम सत्ता आणि पैशाच्या जोरावर खेळला गेला हे वास्तव नाकारता येणार नाही. मात्र लोकांना सर्व प्रकारची सुरक्षितता हवी आहे. मग त्यात पाकिस्तानसारख्या देशाला धडा शिकवण्यापासून ते महागाई कमी करण्यापर्यंत त्याच्या काही अपेक्षा त्यांनी बाळगल्या. बेरोजगारीचा गंभीर प्रश्न पुढच्या कालावधीमध्ये वेगाने सोडवावा लागेल. ज्या काही अपेक्षित सुधारणा करायच्या आहेत त्या काळावर आणि आताच्या निकालांवर सोडून द्याव्या लागतील त्यांची पूर्तता होईल की नाही याची खात्री देता येत नसल्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या या कौलाचा विचार करताना तो निकालाय तस्मै नमः याच पध्दतीने लक्षात घ्यावा लागेल.